# निशाणी क्रं. ५ वरील आदेश

१.  सदरचा अर्ज अर्जदार हिने तिला अंतरीम पोटगी मिळण्याकरीता गैरअर्जदार यांच्या विरुध्द दाखल केला आहे. अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार हा तिचा पती असुन आज तागायत त्यांचे पती पत्नीचे नातेसंबंध कायम आहेत. अर्जदाराचा विवाह गैरअर्जदारा सोबत दिनांक ११.१२.२०१७ रोजी गेवराई, जि. बीड येथे हिंदु रितीरिवाजाप्रमाणे झाला. सदर विवाहामध्ये अर्जदाराच्या आई वडीलांनी गैरअर्जदारास एक तोळयाची सोन्याची अंगठी, सोन्याचे लॉकेट, पाच लाख रुपये आणि इतर संसारउपयोगी वस्तु दिल्या.

२.  विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदण्यास गेली. अर्जदाराच्या सासरी गैरअर्जदार सासु अनिता शिवाजी निकम, अपुर्वा शिवाजी निकम आणि सासुचा मानलेला मुलगा अविनाश पंडीत असे एकत्र राहत होते. दरम्यानच्या काळात सदर विवाहसंबंधातुन अर्जदारास एक ते दिड वर्षांनी एक मुलगी नामे प्रणिता झाली. परंतु ती आठ महिन्याची असतांना किरकोळ आजारामुळे मयत झाली. त्यानंतर गैरअर्जदार तिच्यावर शंका घेत असे. त्याने शेत घेण्यासाठी माहेरावरून पाच लाख रूपये घेउन येण्याची मागणी करण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार अर्जदारास त्याच्या मित्रांना व्हीडीओ कॉल करण्यास सांगत असे. अर्जदाराने तिला होत असलेल्या त्रासाबाबत तिच्या आई वडीलांना सांगीतल्यानंतर अर्जदाराच्या आई वडीलांनी गैरअर्जदारास त्रास देवु नका अशी विनंती गैरअर्जदाराकडे केली. परंतु गैरअर्जदार हा शेतीसाठी पाच लाख रुपये आणले तर अर्जदारास नांदवणार असे म्हणत असे.

३.  अर्जदाराच्या आई वडीलांनी जुलै २०२२ मध्ये देखील गैरअर्जदारास विनंती केली, परंतु तरी देखील दिनांक १२.११.२०२२ रोजी गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबियांनी अर्जदाराकडे पैशाची मागणी करुन तिचे स्त्रीधन काढुन घेतले. गैरअर्जदाराने तिला घरातून

हाकलून दिले अर्जदार ही गैरअर्जदारांनी हकलुन दिल्यापासुन तिच्या आई वडीलांकडे मानवत येथे राहत आहे. तेव्हापासुन अर्जदाराची खाण्यापिण्याची, पालनपोषणाची आरोग्याची कुठलीच काळजी गैरअर्जदाराने घेतली नाही. अर्जदार हीस उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. तिच्या आई वडीलांची परिस्थीती गरीबीची असल्याने ते अर्जदाराचे पालनपोषण करु शकत नाही. याउलट गैरअर्जदार हा गेवराई जि. बीड येथे प्लॉटींगचा व्यवसाय करीत असुन सदर खरेदी विक्रीच्या व्यवहारातुन वर्षाकाठी पाच लाख रुपये कमवतो. तसेच गेवराई येथे गट क्र. १३ फ येथे बागायती शेती असुन शेतीपासुन खर्च वजा जाता वार्षीक तिन लाख रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदारास मासिक पोटगी देण्यास समर्थ आहे. करीता अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराच्या कथनानुसार प्रकरणात पुरावा होवुन निकाली निघण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे अंतरीम पोटगी मंजुर करण्याची मागणी केली.

४. या अर्जास निशाणी क्रं. १२ नुसार गैरअर्जदार यांनी जबाब दाखल केला. गैरअर्जदार यांना अर्जदारा सोबत झालेला विवाह आणि आज तागायत अर्जदारांशी असलेले नातेसंबंध मान्य असुन उर्वरीत सर्व अर्जदाराचे कथने नाकारली आहेत.

५. गैरअर्जदाराने त्यांच्या लेखी जबाबात असे म्हणणे मांडले की, अर्जदार ही स्वछंदी आणि एकलखोरी स्वभावाची असल्याने अर्जदार हीने स्वतः गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकाचा त्याग करुन स्वताच्या मर्जीने तिचे माहेरी राहत आहे. अर्जदार हीस संसार करण्याचा कुठलेही ज्ञान नाही, संसारात आदळआपट करणे, भांडण तंटे करणे, गैरअर्जदारास तोंड टाकुन बोलणे, अपमान करणे तसेच तु मला पसंत नाहीस, तु माझी हौस पुरवू शकत नाहीस असे म्हणुन अपमानास्पद वागणुक देत असे. गैरअर्जदाराच्या व त्याच्या कुटूंबियाच्या नावे कुठलीही शेत जमीन नाही, उलट गैरअर्जदारवर त्याच्या वृध्द आईवर अवलंबुन आहे. गैरअर्जदाराच्या आईस शुगर, बीपीचा आजार असुन उजव्या पायाचे हरणीयाचे ऑपरेशन झाल्यामुळे तिला काहीही कामधंदा होत नाही. याउलट अर्जदार ही कपडे शिवण्याचे काम

करते, सदर टेलरकामापासुन ती दिवसात पाचशे रुपये रोज कमावते, तसेच मेहंदी क्लास केल्यामुळे मेहंदी काढण्याचे काम करुन प्रतिदिवस हजार ते दिड हजार रुपय कमवते. अर्जदार हिच्यावर कोणीही अवलंबुन नाही, ती स्वतची उपजिवीका भागवण्यास समर्थ आहे. अर्जदार ही स्वताच्या मर्जीने माहेरी राहत असल्याने तिला पोटगी मागण्याचा काही ही अधिकार नाही त्यामुळे सदरचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

६. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले. अर्जाचे अवलोकन केले. अर्जदार आणि गैरअर्जदार यांचा विवाह आज ही कायम असल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. तसेच अर्जदार ही तिच्या माहेरी आई वडीलांसोबत मानवत येथे राहत असल्याची बाब ही गैरअर्जदारास मान्य आहे. वरील बाब लक्षात घेता तसेच निशाणी क्रं. १२ वरील गैरअर्जदार यांचा विस्तृत जबाब लक्षात घेता प्रकरणात पुरावा होवुन निकाली निघण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदाराच्या अर्जानुसार ती दिनांक १२.११.२०२२ पासुन मानवत येथे राहत असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. गैरअर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदार ही मानवत येथे राहत असल्याचे गैरअर्जदारास ही मान्य आहे. तसेच अर्जदार ही कमावण्यास सक्षम असल्याबाबत आजघडीस पुराव्याअभावी ते ठरविणे ही उचीत होणार नाही त्यामुळे तिचे मानवत येथे राहण्याचे कारण हे मुळ अर्जाच्या गुणवत्तेवर निकाली निघण्यास पात्र आहे. सद्द स्थितीत गैरअर्जदाराने तिला काही आर्थीक मदत दिली असे दाखवण्याकरीता अभिलेखावर काही दाखल केले नाही.

७. अंतरीम पोटगीची रक्कम ठरवितांना न्यायालयाने ती अशा प्रकारे ठरविणे आवश्यक आहे की, अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र व्यक्तींना भटके व हालअपेष्टेचे तसेच भोग विलासी जीवण जगण्यास मज्जाव करेल. अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्रावरुन कोणतीही स्त्री विवाहानंतर संयुक्तीक कारण असल्याशिवाय माहेरी राहत नाही. तसेच प्रथमदर्शनी माहेरी तिच्या निर्वाहाबाबत उपेक्षा झाल्याचे दिसुन येते. शिवाय, गैरअर्जदाराने अर्जदारास उदरनिर्वाहाकरीता काही रक्कम दिली असल्याचे आज घडीस दर्शवले नाही. वृध्द आईसह

पत्नीचा सांभाळ करणे हे प्राथमीक नैतिक कर्तव्य गैरअर्जदाराचे आहे. गैरअर्जदाराचा राहणीमानाचा दर्जा, त्याच्या कामाचे स्वरुप व फौजदारी प्रक्रिया संहिता या कलमाचे उद्दीष्ट या संपुर्ण बाबी विचारात घेता, अर्जदार ही स्वतःला तात्पुरती अन्न, वस्त्राची रक्कम रु. १२०० हजार प्रत्येकी दरमहा मिळण्यास पात्र आहे व ही रक्कम गैरअर्जदाराने अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदारास दयावी असे आदेशीत करणे उचीत होईल करीता खालील आदेश –

## आदेश

१. अंतरीम पोटगीची विनंती अंशतः मंजुर करण्यात येते.

२. गैरअर्जदार याने अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदारास प्रत्येकी दरमहा १५००/– (एक हजार पाचशे रुपये) अंतरीम पोटगी पुढिल आदेशा पर्यंत दर महिन्याच्या पाच तारखेपुर्वी नियमित दयावेत.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

SACHIN PRAKASH SHILWANT
Digitally signed by SACHIN PRAKASH SHILWANT
Date: 2023.04.04 17:46:23 +0530

दि. ३१.०३.२०२३

[ एस पी शिलवंत ]
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.०२, मानवत.